MHBI120003352018

**नियमित दिवाणी दावा क्र. ६७/२०१८
मधील निशाणी क्रमांक ३६ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी वादी क्र. १ लिंबाजी रायभान रोटे यांचे विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद करून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** उपरोक्त वादी यांनी असे नमुद केले आहे की, वादी क्र. १ लिंबाजी रायभान रोटे हे दिनांक ०४.०६.२०१९ रोजी मयत झाले आहेत. वादी क्र. १ यांनी दिनांक २१.०८.२०१८ रोजी वादमिळकतीतील त्यांचा हिस्सा अर्जदार यांना विक्री केला आहे. त्यानंतर अर्जदार हे वादमिळकतीचे मालक झाले असून ताबेकब्ज्यात आहेत. वादी क्र. १ यांच्या मृत्यूनंतर अर्जदार यांना वादमिळकतीबाबत प्रतिवादीविरूध्द दाद मागण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. अर्जदार यांनी वादी क्र. १ यांच्या हिस्स्याची वादमिळकत खरेदी केली असल्याने वादी क्र. १ यांचे वादमिळकतीबाबत अर्जदार हे वादी क्र.१ यांचे कायदेशीर वारस आहेत. वादी क्र. १ यांच्या मृत्युनंतर त्यांच्या कायदेशीर वारसांना दाव्यात सामाविष्ठ करणेस विलंब झाला आहे. त्यामुळे सदरचा दावा वादी क्र.१ यांचेविरूध्द अबेट झाला आहे. वादी क्र. १ यांच्या मृत्युनंतर अर्जदार यांना त्यांचे कायदेशीर वारस म्हणून वादमिळकतीमध्ये हक्क व अधिकार प्राप्त झाले आहेत. त्यांना प्रस्तुत दावा चालवण्याची संधी देणे गरजेचे आहे. सदरचा अर्ज मंजूर न झाल्यास अर्जदार यांचे अपरिमीत नुकसान होईल ते कशानेही भरून निघणार नाही. सबब सदरचा अर्ज मंजूर कण्यात यावा.

**३.** अर्जास प्रतिवादी १ व २ यांनी म्हणणे सादर केले आहे. प्रतिवादी

यांनी असे नमुद केले आहे की, वादींनी झालेल्या उशीराचे संयुक्तीक कारण दिलेले नाही. अर्जदार यांनी निशाणी ५ चे युक्तीवादास विलंब व्हावा या उद्देशाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सबब सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा.

४. अर्ज व त्यावरील प्रतिवादींच्या म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला.

५. वादी क्रमांक १ दिनांक ०४.०६.२०१९ रोजी मयत झाले आहेत. दिनांक ०३.११.२०१९ पर्यंत अबेटमेंटचा आदेश रदद करून घेणे आवश्यक होते. प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०२.१२.२०२१ रोजी दाखल केलेला आहे. निशाणी क्र. ३८ येथील आदेशान्वये अबेंटमेंट सेट असाइड करण्यासाठी झालेला उशीर माफ करण्यात आलेला आहे. वादी क्र. १ यांनी दिनांक २१.०८.२०१८ रोजी वादमिळकतीतील त्यांचा हिस्सा अर्जदार यांना विक्री केला आहे. त्यानंतर अर्जदार हे वादमिळकतीचे मालक झाले आहेत असे वादी यांचे म्हणणे आहे. अर्जदार यांनी वादी क्र.१ यांच्या हिस्स्याची वादमिळकत खरेदी केली असल्याने वादी क्र. १ यांचे मृत्यूनंतर वादमिळकतीमधील वादी क्र.१ यांच्या हिस्स्याच्या मिळकती बाबत अर्जदार हे कायदेशीर वारस झाले आहेत. वादी क्रमांक १ यांच्या मालकीच्या मिळकतीचे संरक्षण करण्यासाठी वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. वादी क्रमांक १ यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या हिस्स्याच्या मिळकतीमध्ये अर्जदार यांना हक्क, अधिकार प्राप्त होणार आहेत व सदर मिळकतीचे संरक्षण करण्याचे अधिकार प्राप्त होणार आहेत. अशा परिस्थीतीत वादी क्रमांक १ यांचे कायदेशीर वारसांना प्रस्तुत दाव्यात वारसाहक्काने मिळालेल्या मिळकतीचे कब्जेवहिवाटीस प्रतिवादी यांनी हरकत अडथळा करू नये असा मनाई हुकूम मागण्याचा अधिकार प्राप्त होत आहे. वादी क्रमांक १ यांच्या वारसांना प्रस्तुत दाव्यात समाविष्ट करून न घेतल्यास त्यांच्या हिस्स्याच्या मिळकतीबाबत मनाई हुकूम मागण्याच्या अधिकारापासून ते वंचित राहणार

आहेत.सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** सदरचा अर्ज (**निशाणी क्र. ३६**) मंजूर करण्यात येत आहे.

**२.** वादी क्र. १ लिंबाजी रायभान रोटे यांचे विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद करण्यात येत आहे.

दि. ०९.१२.२०२१
स्थळः धारूर

(रा.व.कदम)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
धारूर

नियमित दिवाणी दावा क. ६७/२०१८
( लिंबाजी व इतर वि. महादेव व इतर)

**प्रमाणपत्र**

मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरून अपलोड केलेल्या आदेश/न्यायनिर्णयातील शब्द—नि—शब्द हे मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| **लघुलेखक ग्रेड.३** | : | **ए.एस.गंगणे** |
| न्यायालयाचे नाव | : | सह दिवाणी न्यायालय क. स्तर, धारूर |
| न्यायनिर्णय/आदेशाची तारीख | : | ०९.१२.२०२१ |
| न्यायनिर्णय/आदेशावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०९.१२.२०२१ |
| न्यायनिर्णय/आदेश अपलोड केल्याची तारीख | : | १०.१२.२०२१ |

**सही/—**
(ए.एस.गंगणे)
(लघुलेखक ग्रेड—३)
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, धारूर